# आरोग्य विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नाव** | **जननी सुरक्षा योजना** |
| २ | **योजना कोणाची (केंद्र / राज्य / जि.वा.यो. / जि.प.स्वनिधी)** | केंद्रशासन |
| ३ | **योजनेची संक्षिप्त माहिती** | १. ग्रामीण भागातील गरोदर मातांची शासकीय अथवा नामांकित आरोग्य संस्थेत पसुती झाल्यास ७००/- रुपये अनुदान देय राहील.<br>२. शहरी भागाकरीता गरोदर मातांची शासकिय अथवा नामांकित आरोग्य संस्थेत पसुती झाल्यास ६००/- रुपये अनुदान देय राहील.<br>३. महिलेच्या गरोदर पणातील किंवा पसुती दरम्यान जोखमीमुळे सिझेरियन शस्त्रक्रिया करावयाचे झाल्यास व त्यासाठी शासकिय रुग्णालयात तज्ञ वैदयकिय अधिका-यांना त्यांची सेवा देण्यासाठी १५००/- रुपये मानधन किंवा शस्त्रक्रिया खाजगी मानांकित रुग्णालयात झाल्यास रु.१५००/- अनुदान खाजगी रुग्णालयास देय राहील‍ |
| ४ | **योजनेचे निकष व अटी शर्ती** | सदर लाभार्थी दरिद्र रेषेखालील अथवा अनुसुचित जाती, जमातीचा असावा. |
| ५ | **योजनेचे फायदे** | १. शासकिय व नामांकित संस्थेतील प्रमाण वाढले.<br>२. माता मृत्यु व अर्भकमृत्युचे प्रमाण कमी झाले.<br>३. पुर्ण संस्थेतील मातांचे प्रमाण वाढले. |

## आरोग्य विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नाव** | **कुटुंब कल्याण योजना** |
| २ | **योजना कोणाची (केंद्र / राज्य / जि.वा.यो. / जि.प.स्वनिधी)** | केंद्रशासन |
| ३ | **योजनेची संक्षिप्त माहिती** | १. कार्यक्षेत्रातील सर्व्हे करुन तात्पुरत्या व कायमस्वरुपी संतती प्रतिबंधासाठी पात्र जोडप्यांची यादी तयार करुन त्यांचे मत परिवर्तन करणे.<br>२. कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत पात्र जोडप्यांना निरोध, संतती प्रतिबंधक गोळया यांचे वाटप करणे व तांबी बसविणे.<br>३. पात्र जोडप्यांमधुन तपासणी करुन पुरुष व स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया करुन आर्थिक लाभ देणे.<br>४. वरील सर्व कार्यक्रम सर्व शासकिय संस्थेतून मोफत राबविले जातात. |
| ४ | **योजनेचे निकष व अटी शर्ती** | १. लाभार्थी विवाहीत असुन त्यांची संमती असावी<br>२. तात्पुरत्या किंवा कायमस्वरुपी संतती प्रतिबंधासाठी पात्र असावा.<br>३. जोडप्यांपैकी कोणाचीही पूर्वी शस्त्रक्रिया झालेली नसावी. |
| ५ | **योजनेचे फायदे** | १.छोटे कुटुंब सूखी कुटुंब ही संकल्पना साकार झाली.<br>२. कुपोषित मुलांचे प्रमाण कमी झाले.<br>३. योग्य जोडप्यांना योग्य लाभ मिळाला.<br>४. पुरुष नसबंदीचे प्रमाणत वाढ वाढले. |

## आरोग्य विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नाव** | **उपकेंद्र बळकटीकरण** |
| २ | **योजना कोणाची (केंद्र / राज्य / जि.वा.यो. / जि.प.स्वनिधी)** | केंद्रशासन |
| ३ | **योजनेची संक्षिप्त माहिती** | १. उपकेंद्र स्तरावरुन लाभार्थीला प्रमाणकानुसार अपेक्षित सुविधात वाढ करणे.<br>२. शासनाकडुन पुर्तता न झालेस अपेक्षित लाभ देण्यासाठी उपकेंद्र स्तरावर आर्थिक तजवीज करुन घेणे.<br>३. गरीब व गरजू रुग्णांना तात्काळ सेवा देणे. |
| ४ | **योजनेचे निकष व अटी शर्ती** | दरवर्षी प्राप्त होणाऱ्या १०,०००/- रुपयांतून आर्थिक निकषानूसार खरेदी करणे व व्हाऊचर ठेवणे. समितीच्या संमतीने उपकेंद्र बळकटीकरण करणे. |
| ५ | **योजनेचे फायदे** | १.उपकेंद्राचे बळकटीकरणे होवून, ग्रामीण भागातील लोकांचे उपकेंद्रातून सेवा घेण्याचे प्रमाण वाढले.<br>२. घरी प्रसुतीचे प्रमाण कमी झाले.<br>३. संदर्भ सेवेच्या रुग्णांमध्ये वाढ झाली. |

## आरोग्य विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नाव** | **नियमित लसीकरण** |
| २ | **योजना कोणाची (केंद्र / राज्य / जि.वा.यो. / जि.प.स्वनिधी)** | केंद्रशासन |
| ३ | **योजनेची संक्षिप्त माहिती** | १. लसीकरणाच्या ठिकाणी १०० टक्के लाभार्थी उपस्थित ठेवून सर्व पात्र लाभार्थीचे वेळेत गुणवत्ता पूर्ण करुन आजराचे प्रमाण कमी करणे.<br>२. अर्भक व बाल मृत्युचे प्रमाण कमी करणे. |
| ४ | **योजनेचे निकष व अटी शर्ती** | प्रत्येक लाभार्थीस योग्य वेळी देय लसीचा डोस देणे व पाठपूरावा करणे |
| ५ | **योजनेचे फायदे** | १. पुर्ण संरक्षित बालकांच्या प्रमाणात वाढ<br>२. अर्भक व बालमृत्युचे प्रमाणात घट |

## आरोग्य विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नाव** | **जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम** |
| २ | **योजना कोणाची (केंद्र / राज्य / जि.वा.यो. / जि.प.स्वनिधी)** | केंद्रशासन |
| ३ | **योजनेची संक्षिप्त माहिती** | १. सर्व गरोदर मातांना व १ वर्षापर्यंतच्या बालकांना या योजनेअंतर्गत शासकिय संस्थेमधून उपलब्ध सर्व सेवांचा मोफत लाभ दिला जातो.<br>२. प्रसुतीसाठी गरोदर मातेस घरुन शासकिय संस्थेत शासकिय गाडीने आणणे व प्रसुतीनंतर ३ दिवस औषध व आहार देवून शासकिय गाडीने सोडणे.<br>३. प्रसंगी संदर्भ सेवा देताना शासकिय गाडीने पूढे पाठविणे व आवश्यकतेनूसार शस्त्रक्रियेदरम्यान रक्त संक्रमणाची सोय उपलब्ध करुन देणे.<br>४. १ वर्षाला आतिल बालकाला शासकिय संस्थेतील उपलब्ध औषधे व तपासण्या मोफत करुन देणे व वाहतूकीसाठी शासकिय वाहन उपलब्ध करुन देणे. |
| ४ | **योजनेचे निकष व अटी शर्ती** | सर्व गरोदर मातांना व १ वर्षाआतील सर्व बालकांना सदर योजनेचा लाभ दिला जातो. |
| ५ | **योजनेचे फायदे** | १. माता व बालकांना वेळेत योग्य सेवा मोफत मिळाल्या.<br>२. गंभीर रुग्णांच्या संदर्भ सेवेत वाढ<br>३. माता मृत्यू व अर्भक मृत्युचे प्रमाण कमी झाले. |

# आरोग्य विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नाव** | **ग्राम बाल विकास केंद्र** |
| २ | **योजना कोणाची (केंद्र / राज्य / जि.वा.यो. / जि.प.स्वनिधी)** | केंद्रशासन |
| ३ | **योजनेची संक्षिप्त माहिती** | १.जागतिक आरोग्य संघटनेच्या नवीन मापदंडानूसार उंचीनूसार वजन या निकषानुसार ० ते ६ वयोगटातील लहान मुलांचे वर्गीकरण सर्व साधारण मध्यम तीव्र कुपोषित व मध्यम तीव्र कुपोषित बालकांचे श्रेणीवर्धन करण्यासाठी ग्रामीण स्तरावर उपकेंद्र मुख्यालयाच्या गावातील अंगणवाडीमध्ये ग्राम बाल विकास केंद्र स्थापन करुन ३० दिवस दाखल केले जाते.<br>२. या केंद्रामध्ये मुलांना दररोज पुरक व पोषक जादाचा आहार देऊन तज्ञ वैदयकिय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखालील औषध उपचारही देण्याची कार्यवाही सुरु आहे. यामधून ज्या मुलांचे श्रेणीवर्धन होणार नाही त्याच्यासाठी प्रा.आ.केंद्र स्तर, ग्रामीण रुग्णालय स्तर व जिल्हा रुग्णालय स्तरावर बाल विकास केंद्र स्थापन करणेत आली आहेत.<br>३. लाभार्थी दाखल व ३० दिवसानंतर घरी सोडण्यासाठी शासकिय वाहनांची सोय केली जाते.<br>४. या कार्यक्रमासाठी आवश्यक असणारे अनुदान प्रा.आ.केंद्र स्तरावर वर्ग करुन लाभार्थीच्या संख्येनिहाय आवश्यक असणारे अनुदान अंगनवाडींना देणेत येते. |
| ४ | **योजनेचे निकष व अटी शर्ती** | सर्व कुपोषित बालके सॅम, मॅम गंभीर आजारी बालके . |
| ५ | **योजनेचे फायदे** | १. मुले आजारी पडण्याचे प्रमाण कमी झाले आहे.<br>२. बाल मुत्येचे प्रमाण कमी झाले आहे. |

## आरोग्य विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नाव** | **आशा स्वयंसेविका योजना** |
| २ | **योजना कोणाची (केंद्र / राज्य / जि.वा.यो. / जि.प.स्वनिधी)** | केंद्रशासन |
| ३ | **योजनेची संक्षिप्त माहिती** | १. विविध कार्यक्रमांतर्गत कामाच्या आधारित मोबदला अदा करणेत येतो.<br>२. आरोग्य यंत्रणा सेवाभावी संस्था व समाजातील अन्य महत्वपुर्ण घटक यामध्ये सुसंवाद व समन्वय निर्माण करण्याच्या दृष्टीने आशा स्वयंसेविका महत्वपुर्ण दुवा आहे.<br>३. स्थानिक व विवाहीत असावी.<br>४. वय २० वर्षापेक्षा जास्त असावे. |
| ४ | **योजनेचे निकष व अटी शर्ती** | १. आशा निवड ही ग्रामसभेमध्ये होते.<br>२. आशा ही किमान शैक्षणिक अर्हता ८ वी पास असणे आवश्यक |
| ५ | **योजनेचे फायदे** | १. पुर्ण सुरक्षित माता व बालक यांचे प्रमाण वाढले.<br>२. माता मुत्ये, अर्भक व बाल मुत्येचे प्रमाण घटले.<br>३. राष्टीय कार्यक्रमाचे उदिष्ट साध्य होण्यास मदत झाली आहे.<br>४. रुग्ण लवकर निदान होवून पूर्ण उपचार घेवून बरे होण्याचे प्रमाण वाढले.<br>५. साथरोग आटोक्यात आणण्यांमध्ये यश आले आहे. |

# आरोग्य विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नाव** | मोबाइल मेडीकल युनिट |
| २ | **योजना कोणाची (केंद्र / राज्य / जि.वा.यो. / जि.प.स्वनिधी)** | केंद्रशासन |
| ३ | **योजनेची संक्षिप्त माहिती** | ४. जिल्हास्तरावर फिरते वैदयकीय पथ्क स्थापन केले जाते.<br>५. त्यांना जिल्हयातील अतिदुर्गम भागातील गावे निवडून दिली जातात व त्यानुसार त्यांनी दरमहा भेटीद देऊन त्याठिकाणी आरोग्य सेवा देणेची आहे. त्यामध्ये लोकांना किरकोळ उपचार आरोग्य सेवा व संदर्भ सेवा दिलेली आहे. |
| ४ | **योजनेचे निकष व अटी शर्ती** | सदर योजना स्वयंसेवा संस्थामार्फत राबविली जाते. जिल्हास्तरावरुन अनुदान वर्ग करणेत येते. |
| ५ | **योजनेचे फायदे** | .अतिदुर्गत भागात लोकांना विनाविलंब सेवा मिळत आहे. तसेच रुग्णांची दळणवळनाच्या अडचणी दूर झाल्या आहेत. |

# आरोग्य विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नाव** | गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (गर्भलिंग निवड प्रतिबंध ) कायदा १९९४ पीसीपीएनडीटी |
| २ | **योजना कोणाची (केंद्र / राज्य / जि.वा.यो. / जि.प.स्वनिधी)** | केंद्रशासन |
| ३ | **योजनेची संक्षिप्त माहिती** | १. देशपातळीवरुन व राज्यपातळीवरुन योग्य नियंत्रण होते.<br>२. जिल्हास्तरावर मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती केली जाते.<br>३. गरोदर माता व त्यांचे कुटुंब यांचे समोपदेशन केले जाते.<br>४. समाजामध्ये मुलींच्या जन्मा बददल जनजागृती केली जाते.<br>५. कायदया अंतर्गत कार्यक्षेत्र ातील सोनोग्राफी केंद्र व गर्भपात संख्या तसेच प्रसुती संख्या यांची तपासणी होते.<br>६. सदर तपासणीमध्ये कसुर करणारया संस्थेवर व व्यक्तीवर कायदेशीर कार्यवाही केली जाते. व ती व्यक्ती व संस्था दंडास पात्र आहे. |
| ४ | **योजनेचे निकष व अटी शर्ती** | सोनोग्राफी सेंटर गर्भपात प्रसुती संस्था तसेच रुग्णांचे फार्म भरुन सदर नोंदी अदयावत ठेवून त्यांचा दरमहा अहवाल तयार करुन पाठपुरावा करुन मुलींच्या जन्माचे प्रमाण वाढवले जात आहे. |
| ५ | **योजनेचे फायदे** | कायदयाच्या अमंलबजावणीद्वारे मुलींचे प्रमाण दरहजारी मुलांमागे ० ते ६ वयोगटामधील ९०३ इतके साध्य झाले आहे. |

# आरोग्य विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नाव** | पायाभूत विकास कक्ष |
| २ | **योजना कोणाची (केंद्र / राज्य / जि.वा.यो. / जि.प.स्वनिधी)** | केंद्रशासन |
| ३ | **योजनेची संक्षिप्त माहिती** | १. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत नवीन उपकेंद्राच्या बांधकामामध्ये प्रसुती रुमची व्यवस्था करण्यात येणार आहे. जेणेकरुन उपकेंद्र ठिकाणी प्रसुतीची व्यवस्था झालेने स्थानिक लोकांना त्याचा जास्तीत जास्त फायदा होईल. गरोदर माता व त्यांचे कुटुंब यांचे समोपदेशन केले जाते. |
| ४ | **योजनेचे निकष व अटी शर्ती** | या कार्यक्रमा अंतर्गत नवीन बांधकाम व दुरुस्ती कामाची यादी शासनाकडे प्राप्त होते. सदर कामांच्या यादीनुसार कामांच्या निविदा ई निविदा पध्दतीचा अवलंब करुन मागविणेत येतात. व कामे पूर्ण करुन घेण्यात येतात. |
| ५ | **योजनेचे फायदे** | स्वतःची इमारती असलेल्या उपकेंद्राची व प्रा.आ.केंद्राची संख्या वाढली तसेच सर्व सोई उपलब्ध झालेने ग्रामीण भागातील लोकांनी मिळणारया सेवेचा लाभ घे् |

# आरोग्य विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | **योजनेचे नाव** | आयपीएचएस |
| २ | **योजना कोणाची (केंद्र / राज्य / जि.वा.यो. / जि.प.स्वनिधी)** | केंद्रशासन |
| ३ | **योजनेची संक्षिप्त माहिती** | १. आयपीएचएस हे एक आरोग्य संस्थेचे गुणात्मक व संस्थात्मक दर्जा दाखवणारे मानांकन आहे.<br>२. या योजनेअंतर्गत संस्थांना विशिष निधी प्राप्त होतो.त्याचा विनियोग संस्थेस गरजेची मनुष्यबळ मुलभूत भौतिक सुविधा तसेच रुग्णालयातील लागणारे इनस्टूमेंट इक्यिुपमेंट मेडिसिन साहित्य घेणेसाठी होतो. |
| ४ | **योजनेचे निकष व अटी शर्ती** | ग्रामीण रुग्णालयामध्ये कोणत्या सेवा निश्चितपणे मिळतील व त्यासाठी कोणत्या किमान बाबी तिथे असतील हे आयपीएचएस मध्ये ठरेल या किमान बाबी खालील प्रमाणे.<br>१. किमान वैद्किय व सहाय्यक मनुष्यबळ<br>२. आवश्यक साधने<br>३. औषधांची उपलब्धता<br>४. मुलभूत भौतिक सुविधा<br>५. जनआरोग्य हक्काची सनद |
| ५ | **योजनेचे फायदे** | १. ग्रामीण भागातील रुग्णांना जवळच्या ठिकाणी गुणात्मक सेवा मिळणेत वाढ झाली आहे.<br>२. रुग्णालयात रुग्ण सदर्भ होणेचे प्रमाण झाले आहे.<br>३. रुग्ण सेवेत विशेष वाढ झाली आहे. |